Registered No. B. L.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 11TH MARCH 1897.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आनरेबल गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १४ माहे जानेवारी सन १८९७ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—**

### सन १८९७ चा आक्ट १.

सन १८९० चा आक्ट ३७ ( सरकारी चाकरांचे वर्तणुकेचा तपास नीट राखण्यासाठींचा ) हा सुधारण्याबाबदचा आक्ट.

ज्याअर्थीं सन १८९० चा आक्ट ३७ ( सरकारी चाकरांचे वर्तणुकेचा तपास नीट राखण्यासाठींचा ) हा सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीलप्रमाणें ठरविलें आहे:—

१. सदरहू सन १८९० चा आक्ट ३७ यास, सन १८९० चा सरकारी चाकरांसंबंधी ( तपासाबाबद ) आक्ट, असें म्हणावें.

*सन १८५० च्या ३७ व्या आक्टाचा सरनामा.*

२. सदरहू आक्टाच्या उद्देशांत "चाकरींतून" या शब्दाबद्दल "त्यांच्या नेमणुकांवरून" हे शब्द दाखल केले पाहिजेत, आणि "ईस्ट इंडिया कंपनीचे" या शब्दांबद्दल "हिंदुस्थान सरकारचे" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

*सन १८५० चा आक्ट ३७ याच्या उद्देशाची सुधारणा.*

३. सदरहू आक्टाच्या २ ऱ्या कलमांत, "ईस्ट इंडिया कंपनीचे चाकरींतील ज्या कोणतेही माणसास" या शब्दांबद्दल "सदरील सरकारच्या चाकरींतील ज्या कोणत्याही माणसास त्याच्या नेमणुकीवरून त्या" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

*सन १८५० चा आक्ट ३७ याच्या दुसऱ्या कलमाची सुधारणा.*

४. सदरहू आक्टाच्या २३ व्या कलमाबद्दल खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:—

*सन १८५० चा आक्ट ३७, याच्या २३ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.*

"२३. या आक्टाखालील सरकारचे अधिकार गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस सर्व प्रसंगीं चालवितां येतील, आणि जेव्हां आरोपित मनुष्यास त्याच्या नेमणुकीवरून स्थानिक सरकार बरतर्फ करूं शकेल, तेव्हां ते अधिकार स्थानिक सरकारालाही चालवितां येतील."

*या आक्टाखालील सरकारचे अधिकार कोणीं चालवावयाचे.*

जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation )
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## सन १८९७ चा सामान्य कलमांच्या आक्टाचा मसुदा.

### अनुक्रमणिका.


प्रथमारंभींचे ठराव.

कलमें.

१. लहान सरनामा व सुरवात.

२. आक्ट रद्द करणें.

सामान्य व्याख्या.

३. व्याख्या.

४. वरील व्याख्या पूर्वीच्या कायद्यास लागू करणें.

अर्थ करण्यासंबंधाचे सामान्य नियम.

५ कायदे अमलांत येणें.

६. रद्द करणें व अमलांतून जाणें ह्यांचा परिणाम.

७. रद्द केलेले कायदे पुनः संस्थापित करणें.

८. रद्द केलेल्या कायद्यांवर दिलेल्या हवाल्यांचा अर्थ.

९. मुदतीची सुरवात व शेवट.

१०. वेळ मोजणें.

११. अंतरें मोजणें.

१२. कायद्यांमध्यें दिलेला ड्यूटीचा दर प्रमाणानें समजावा.

१३. लिंग व वचन.

अधिकार व कामदार.

१४. सरकारास दिलेले अधिकार वेळोवेळीं चालविणें.

१५. नेमणूक करण्याच्या अधिकारांत, हुद्याच्या नात्यानें नेमणूक करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

कलमें.

१६. नेमणूक करण्याच्या अधिकारांत सस्पेंड करण्याच्या किंवा बर्तर्फ करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

१७. एका अधिकाऱ्याचे जागेवर दुसरा अधिकारी नेमणें.

१८. स्थानापन्न.

१९. मुख्य अधिकारी व त्यांचे ताब्यांतील अमलदार.

कायद्याअन्वयें केलेले हुकुम, कानू इत्यादिकांच्या संबंधानें ठराव.

२०. कायद्याअन्वयें काढलेल्या हुकुम वगैरेचा अर्थ करणें.

२१. हुकुम, कानू अगर पोटकायदे करण्यास दिलेल्या अधिकारांत त्या हुकुमांत, कानूंत अगर पोट कायद्यांत जास्त मजकूर घालण्याच्या, ते सुधारण्याच्या, त्यांत फेरफार करण्याच्या अगर ते रद्द करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

२२. कायदा ठरणें व सुरू होणें यांच्या दरमियान कानू अगर पोट कायदे करणें आणि हुकुम फर्मावणें.

२३. पूर्वी प्रसिद्ध करून कानू अगर पोटकायदे ठरवणें या गोष्टीस लागू असणारे ठराव.

२४. रद्द करून पुनः ठरविलेल्या कायद्याअन्वयें केलेले हुकुम वगैरे चालू असणें.

कलमें.

किरकोळ.

२५. दंड वसूल करणें.

२६. दोन अगर जास्त कायद्यांअन्वयें शिक्षा करण्यास पात्र अशा अपराधाबद्दल ठराव.

२७. पोस्टाच्या द्वारें बजावणें याचा अर्थ.

कलमें.

२८. कायद्याचा उल्लेख करणें.

२९. पूर्वीचे कायदे, कानू व पोट कायदे यांचा बचाव.

परिशिष्ट.

रद्द केलेले कायदे.

---

**सन १८६८ व सन १८८७ चे सामान्य कलमांचे आक्ट एकत्र करून त्यांची व्याप्ति वाढविण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.**

---

ज्यापेक्षां सन १८६८ व सन १८८७ चे सामान्य कलमांचे आक्ट एकत्र करून त्यांची व्याप्ति वाढविणें योग्य आहे त्यापेक्षां यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे:—

**प्रथमारंभींचे ठराव.**

१. (१) ह्या आक्टास सन १८९७ चा सामान्य कलमांचा आक्ट असें ह्मणावें; आणि लहान सरनामा व सुरवात.

(२) तो लागलाच अमलांत येईल.

२. परिशिष्टांत सांगितलेले आक्ट सदर्हू परिशिष्टाच्या चौथ्या कोष्टकांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर रद्द केले आहेत. आक्ट रद्द करणें.

**सामान्य व्याख्या.**

३. ह्या आक्टांत तसेंच हा आक्ट सुरू झाल्यानंतर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेल्या सर्व आक्टांत आणि सर्व रेग्युलेशनांत विषयास किंवा पूर्वापर संबंधास बाध येत नसेल तर,—— व्याख्या.

(१) "साह्य करणें" हे शब्द, व व्याकरणाच्या संबंधानें त्यांचीं होणारीं रूपां तरें व तज्जातीय शब्द यांचा अर्थ, हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याबाबदच्या कायद्यांत आहे तोच समजावा: "साह्य करणें"

(२) "कृत्य" हा शब्द गुन्ह्याच्या संबंधानें अथवा दिवाणी नुकसानाच्या संबंधानें वापरण्यांत येतो तेव्हां त्यांत कृत्यांच्या मालिकेचा समावेश होतो, आणि जे शब्द कृत्यांच्या कारण्यास लागू आहेत ते शब्द गैरकायद्यानें जें कृत्यांचें वर्जन त्यासही लागू आहेत: "कृत्य."

(३) ज्या मनुष्यांस शपथेबद्दल प्रतिज्ञा किंवा इकरार करण्याची कायद्याची परवानगी असेल त्या मनुष्यांच्या बाबतींत प्रतिज्ञा व इकरार करणें यांचा समावेश "प्रतिज्ञा" या शब्दांत होतो. "प्रतिज्ञा."

(४) "बारिस्टर" या शब्दाचा अर्थ इंग्लंडचा किंवा ऐर्लंडचा बारिस्टर किंवा स्काटलंडांतील फ्याकल्टी आफ् आडव्होकेट्स्‌चा मेंबर: "बारिस्टर."

"बंगालचा आक्ट." (५) "बंगालचा आक्ट" या संज्ञेचा अर्थ सन १८६१ व सन १८९२ च्या हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदच्या आक्टांबरहुकूम बंगालचे लेफ्टेनेंट गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेला कोणताही आक्टः

"मुंबईचा आक्ट." (६) "मुंबईचा आक्ट" ह्मणजे सन १८६१ व सन १८९२ च्या हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदच्या आक्टांबरहुकूम मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेला कोणताही आक्टः

"ब्रिटिश हिंदुस्थान." (७) "ब्रिटिश हिंदुस्थान" ह्मणजे मलिका माआझमांच्या राज्यांतील ज्या ज्या मुलुकांचा आणि जाग्यांचा त्या त्या वेळीं, मलिका माआझमा, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचे मार्फत अथवा हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांच्या ताब्यांतील कोणत्याही गव्हर्नर मार्फत अथवा दुसऱ्या एखाद्या अमलदारामार्फत राज्यकारभार चालवीत असतील, ते सगळे मुलूक व जागा.

"ब्रिटिश मुलूक." (८) "ब्रिटिश मुलूक" ह्मणजे संयुक्त राज्याशिवायचा मलिका माआझमांच्या राज्याचा कोणताही भाग, आणि त्या राज्यांतील कोणताही भाग मुख्य आणि स्थानिक कायदे करणारी अशा दोन्ही मंडळ्यांच्या हुकुमाखालीं असेल तेव्हां त्या मुख्य कायदे करणाऱ्या मंडळीच्या ताब्यांतील सर्व भाग या व्याख्येच्या कारणासाठीं एक ब्रिटिश मुलूख आहे असें समजलें पाहिजे :

"बाब." (९) "बाब" ह्मणजे ज्या आक्टांत अथवा रेग्युलेशनांत सदहू शब्द येईल त्या आक्टाची अगर रेग्युलेशनची बाबः

"कलेक्टर." (१०) "कलेक्टर" ह्मणजे इलाख्याच्या मुख्य शहरांत, प्रसंगाप्रमाणें, कलकत्त्याचा, मद्रासचा अथवा मुंबईचा कलेक्टर आणि दुसऱ्या ठिकाणीं, जिल्ह्याचा महसूलसंबंधी कारभार ज्याचे स्वाधीन असेल तो मुख्य अमलदारः

"वसाहत." (११) "वसाहत" ह्मणजे ब्रिटिश येलंड्स आणि ब्रिटिश हिंदुस्थान यांशिवायचा मलिका माआझमांच्या राज्याचा कोणताही भाग, आणि त्या राज्यांतील कोणताही भाग मुख्य आणि स्थानिक कायदे करणारी अशा दोन्ही मंडळ्यांच्या हुकुमाखालीं असेल तेव्हां त्या मुख्य कायदा करणाऱ्या मंडळीच्या ताब्यांतील सर्व भाग ह्या व्याख्येच्या कारणासाठीं एक वसाहत आहेत असें समजलें पाहिजेः

"सुरुवात." (१२) "सुरुवात" या शब्दाचा उपयोग एखादा आक्ट किंवा रेग्युलेशन यासंबंधानें केला असेल तेव्हां, त्या शब्दाचा अर्थ ज्या तारखेस तो आक्ट किंवा रेग्युलेशन अमलांत येतो ती तारीखः

"कमिशनर." (१३) "कमिशनर" ह्मणजे भागाचा महसूलसंबंधी कारभार ज्याच्या स्वाधीन असेल तो मुख्य अमलदारः

"कॉन्शुलर आफिसर." (१४) "कॉन्शुलर ऑफिसर" ह्यांत कॉन्सल-जनरल, कॉन्सल, व्हाइस् कॉन्सल, कॉन्सुलर एजंट, प्रो-कॉन्सल आणि ज्या कोणा मनुष्यास त्या त्या वेळीं कॉन्सल जनरल, कॉन्सल, व्हाइस् कॉन्सल अथवा कॉन्सुलर एजंट यांचीं कामें करण्याचा अधिकार दिला असेल त्या माणसाचा समावेश होतोः

"डिस्ट्रिक्ट [जिल्हा] जज्ज." (१५) "डिस्ट्रिक्ट [ जिल्हा ] जज्ज" ह्मणजे एखाद्या मुख्य अवल दिवाणी कोर्टाचा जज्ज. परंतु हें कोर्ट जेव्हां अवल दिवाणी फिर्यादी घेण्याची आपली मामूल किंवा विशेष हुकुमत चालवील तेव्हां त्या कोर्टाचा समावेश या शब्दांत होत नाहीं असें समजावें :

"दस्तऐवज." (१६) "दस्तऐवज" या शब्दांत, जी वस्तु कोणत्याही बाबतीचा दाखला ठेवण्याकरितां वापरण्याचा उद्देश असेल अगर वापरतां येईल त्या वस्तूवर अक्षरांनीं अगर

अंकांनीं अगर खुणांनीं, अथवा ह्या साधनांपैकीं एकापेक्षां अधिकांच्या योगानें दर्शित केलेल्या अगर वर्णिलेल्या कोणत्याही बाबतीचा समावेश होतो:

(१७) "कायदा" ह्या शब्दांत (यानंतर व्याख्या केल्याप्रमाणेंच्या) रेग्युलेशनचा आणि बंगाल, मद्रास अथवा मुंबई कोडांतील कोणत्याही रेग्युलेशनचा आणि कोणत्याही आक्टांत अथवा वर सांगितलेल्या कोणत्याही प्रकारच्या रेग्युलेशनांत असलेल्या कोणत्याही ठरावाचा समावेश होतो: "कायदा."

(१८) ज्या मनुष्यास आपले शास्त्राप्रमाणें दत्तक घेण्याचा अधिकार आहे त्या मनुष्याचे बाबतींत "बाप" या शब्दांत दत्तक घेणारे बापाचा समावेश होतो असें समजावें: "बाप."

(१९) "सरकारी साल" या संज्ञेचा अर्थ एप्रिलच्या पहिल्या तारखेस सुरू होणारें साल असा समजावा: "सरकारी साल."

(२०) "गॅझेट" या शब्दाचा उपयोग हिंदुस्थान सरकारानें काढलेल्या जाहिरनाम्याच्या संबंधानें केला असेल तेव्हां त्याचा अर्थ गॅझेट आफ् इंडिया असा होतो आणि ह्याचा उपयोग स्थानिक सरकारानें, हैकोर्टानें, स्थानिक अधिकाऱ्यानें अथवा स्थानिक सरकारच्या ताब्यांतील अमलदारानें काढलेल्या कोणत्याही जाहिरनाम्याच्या संबंधानें केला असेल तेव्हां, त्याचा अर्थ, सदर्हू सरकारानें अथवा त्यानें दिलेल्या अधिकारावरून त्या प्रांतासाठीं प्रसिद्ध केलेलें स्थानिक सरकारी गॅझेट (जर असेल तर) असा होतो, अथवा जर असें स्थानिक सरकारी गॅझेट सदर्हूप्रमाणें प्रसिद्ध होत नसेल तर, गॅझेट ऑफ् इंडिया असा होतो: "गॅझेट."

(२१) जेव्हां कोणतीही गोष्ट खरोखर प्रामाणिकपणानें केली असेल तेव्हां ती "इमानानें" केली आहे असें समजण्यांत येईल; मग ती हयगईनें केली असो अगर नसो: "इमानानें."

(२२) "सरकार" अथवा "सदर्हू सरकार" यांत स्थानिक सरकार तसेंच हिंदुस्थान सरकार यांचा समावेश होतो: "सरकार."

(२३) "हिंदुस्थान सरकार" याचा अर्थ, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल अथवा गव्हर्नर जनरल हा कौन्सिलांतून गैरहजर असल्यास, प्रेसिडेंट इन् कौन्सिल किंवा एकटा गव्हर्नर जनरल जो जो अखत्यार कायदेशीर रीतीनें अनुक्रमें चालवूं शकेल त्या त्या अखत्यारासंबंधानें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल, प्रेसिडेन्ट इन् कौन्सिल किंवा एकटा गव्हर्नर जनरल, असा समजावा: "हिंदुस्थान सरकार."

(२४) "मलिका माअज्ञमा" अथवा "राणी" यांत तिच्या स्थानापन्नांचा समावेश होतो: "मलिका माअज्ञमा" अथवा "राणी."

(२५) "हैकोर्ट":— "हैकोर्ट."

(१) ही संज्ञा दिवाणी कामाच्या संबंधानें वापरली असेल तेव्हां तिचा अर्थ, ती संज्ञा जो आक्ट अगर रेग्युलेशन यांत असेल तो आक्ट अगर रेग्युलेशन ब्रिटिश हिंदुस्थानच्या ज्या भागांत अमलांत असेल त्या भागांतील सर्वांत मुख्य दिवाणी अपिलाचें कोर्ट असा होतो;

(२) ही संज्ञा युरोपीयन ब्रिटिश रैयतेवर, किंवा युरोपीयन ब्रिटिश रैयतेबरोबर ज्या मनुष्यांवर तोहमत ठेविली असेल त्या मनुष्यांवर फौजदारी रीतीनें चालविलेल्या कामाच्या संबंधानें वापरली असेल तेव्हां तिचा अर्थ, प्रसंगाप्रमाणें, कलकत्त्याचें, मद्रासचें किंवा मुंबईचें हैकोर्ट, वायव्य प्रांताचें हैकोर्ट, पंजाबचें चीफ् कोर्ट, किंवा रंगूनचा रिकार्डर असा होतो; आणि

(३) ही संज्ञा युरोपीयन ब्रिटिश रैयत नसेल अशा माणसांवर किंवा युरोपीयन ब्रिटिश रैयतेबरोबर ज्या मनुष्यांवर तोहमत ठेविली नसेल त्या मनुष्यांवर फौजदारी रीतीनें चालविलेल्या कामाच्या संबंधानें वापरली असेल तेव्हां तिचा अर्थ, ती संज्ञा जो

आक्ट किंवा रेग्युलेशन यांत वापरलेली तो आक्ट किंवा रेग्युलेशन ब्रिटिश हिंदुस्थानच्या ज्या भागांत अमलांत असेल त्या भागांतील सर्वांत मुख्य फौजदारी अपिलाचें किंवा तपासणीचें कोर्ट असा, किंवा जेथें सदहू प्रकारचें कोणतेंही कोर्ट त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याही कायद्याप्रमाणें स्थापिलें नसेल तेथें, ज्या अमलदाराला गव्हर्नर जनरल त्यासाठीं नेमील तो अमलदार असा, होतो:

"स्थावर मिळकत." (२६) "स्थावर मिळकत" या संज्ञेंत, जमीन व जमीनींतून उत्पन्न होणारे फायद्यांचा व जमिनीस चिकटलेल्या वस्तूंचा व जमीनीस चिकटलेल्या वस्तूंला कायम रीतीनें लावलेल्या वस्तूंचा समावेश होतो:

"कैद." (२७) "कैद" ह्मणजे हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींच्या कायद्यांत सांगितलेले दोहों प्रकारांपैकीं कोणतेही एका प्रकारची कैद:

"हिंदुस्थान." (२८) "हिंदुस्थान" ह्मणजे ब्रिटिश हिंदुस्थान, आणि मलिका माआझमांच्या सार्वभौम सत्तेखालील कोणताही देशी राजा किंवा संस्थानिक याच्या ज्या मुलुखांवर ती सत्ता हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचे मार्फत किंवा हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचे ताब्यांतील कोणी गव्हर्नराचे किंवा दुसऱ्या कोणा अमलदाराचे मार्फत अमल चालविण्यांत येत असेल तो मुलूख:

"स्थानिक अधिकारी." (२९) "स्थानिक अधिकारी" ह्मणजे, म्युनिसिपल कामिटी, जिल्हा बोर्ड, पोर्ट कमिशनरांची मंडळी, किंवा ज्या दुसऱ्या अधिकाऱ्यास कोणताही म्युनिसिपल किंवा लोकल फंड यावर निर्बंध ठेवण्याचा किंवा त्याची वहिवाट करण्याचा कायद्यावरून अथवा सरकारानें सोंपविल्यावरून हक्क पोहोंचतो, तो:

"स्थानिक सरकार." (३०) "स्थानिक सरकार" ह्मणजे ज्या आक्टांत किंवा रेग्युलेशनांत हे शब्द असतील तो आक्ट किंवा रेग्युलेशन ब्रिटिश हिंदुस्थानाचे ज्या भागांत अमलांत असेल त्या भागांत राज्यकारभार चालविण्याचा अधिकार कायद्याअन्वयें ज्या मनुष्यास असेल तो मनुष्य: आणि या शब्दांत चीफ कमिशनराचा समावेश होतो:

"मद्रासचा आक्ट." (३१) "मद्रासचा आक्ट" ह्मणजे सन १८६१ आणि १८९२ चे हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदचे आक्ट यांअन्वयें मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेला आक्ट:

"माजिस्ट्रेट." (३२) "माजिस्ट्रेट" या शब्दांत त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याअन्वयें माजिस्ट्रेटाचे सर्व किंवा कोणतेही अधिकार चालविणाऱ्या प्रत्येक मनुष्याचा समावेश होतो:

तारवाचा "मास्तर." (३३) एकाद्या तारवाच्या संबंधानें "मास्तर" या शब्दाचा उपयोग केलेला असेल तेव्हां त्याचा अर्थ, (पैलट किंवा हार्बरमास्तर खेरीज करून), त्या त्या वेळीं ज्या कोणत्याही मनुष्याच्या निर्बंधांत किंवा स्वाधीन तें तारूं असेल तो मनुष्य असा होतो:

"महिना." (३४) "महिना" ह्मणजे ब्रिटिश क्यालेंडर ह्मणजे पंचांग यांत लिहिल्याप्रमाणें महिना:

"जंगम मिळकत." (३५) "जंगम मिळकत" ह्मणजे स्थावर मिळकत खेरीज करून इतर दरेक प्रकारची मिळकत:

"वायव्य प्रांत व अयोध्याचा आक्ट." (३६) "वायव्य प्रांत व अयोध्याचा आक्ट" ह्मणजे सन १८६१ व सन १८९२ चे हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदचे आक्ट यांअन्वयें वायव्य प्रांत व अयोध्याच्या लेफ्टेनंट गव्हर्नर इन् कौन्सिलनें केलेला आक्ट:

"नोटिस." (३७) "नोटीस" या शब्दाचा कायदेशीर रीतीनें चालविलेल्या कामाच्या संबंधीं उपयोग केला असेल तेव्हां त्याचा अर्थ लेखी नोटीस असा होतो:

(३८) "शपथ" या शब्दांत ज्या मनुष्यास शपथेबद्दल प्रतिज्ञा किंवा इकरार करण्याची कायद्यावरून परवानगी असेल त्या मनुष्याचे बाबतींत प्रतिज्ञा व इकरार यांचा समावेश होतो: "शपथ."

(३९) "अपराध" ह्मणजे विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याही कायद्यावरून जें कोणतेंही कृत्य किंवा वर्जन शिक्षेस पात्र केलें असेल तें कृत्य किंवा वर्जन: "अपराध."

(४०) "भाग" ह्मणजे ज्या आक्टांत किंवा रेग्युलेशनांत सदहू शब्द येईल त्या आक्टाचा किंवा रेग्युलेशनचा भाग: "भाग."

(४१) "मनुष्य" या शब्दांत कोणतेही मंडळीचा, अगर जमातीचा अगर मनुष्यांचे समुदायाचा समावेश होतो, मग त्या मंडळीस, अगर जमातीस अगर समुदायास सनद मिळाली असो अगर नसो: "मनुष्य."

(४२) "पोलिटिकल एजंट" ह्मणजे ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दीबाहेरील कोणत्याही मुलुखांतील अगर जागेंतील सरकारच्या तर्फेचा मुख्य अमलदार, आणि ह्या शब्दांत, जी जागा ब्रिटिश हिंदुस्थानचा भाग नसेल, त्या जागीं परराज्याच्या हुकमतीबाबदचे व अपराध्यांस स्वाधीन करण्याबाबदच्या विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कायद्याप्रमाणें पोलिटिकल एजंटचे सर्व किंवा कोणताही अधिकार चालविण्यास हिंदुस्थान सरकारानें अगर स्थानिक सरकारानें हिंदुस्थान सरकारचा अगर स्थानिक सरकारचा जो कोणताही अमलदार नेमला असेल त्या अमलदाराचा समावेश होतो: "पोलिटिकल एजंट."

(४३) "इलाका शहर" ह्मणजे प्रसंगानुसार कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई येथील अदालतीच्या हैकोर्टाची जी अवल दिवाणी दावे घेण्याची मामूल हुकुमत तिच्या स्थलसीमेंत त्या त्या काळीं जी जागा असेल ती: "इलाका शहर."

(४४) "प्रिव्ही कौन्सिल" ह्मजे मलिका मआझमांच्या मोस्ट आनरेबल प्रिव्ही कौन्सिलचे विवक्षित काळचे उमराव व इतर. "प्रिव्ही कौन्सिल."

(४५) "प्रांत" ह्मणजे ज्या मुलुखावर विवक्षित काळीं स्थानिक सरकार अमंल चालवीत असेल तो मुलूख: "प्रांत."

(४६) "साधारण सर्व लोकांस पीडा" ह्मणजे हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींच्या कायद्यांत जिची व्याख्या केली आहे अशी साधारण सर्व लोकांस पीडा: "साधारण सर्व लोकांस पीडा."

(४७) "नोंदलेलें" हा शब्द एकाद्या दस्तऐवजाच्या संबंधानें वापरला असेल तेव्हां त्याचा अर्थ, दस्तऐवज नोंदण्याच्या संबंधानें विवक्षित काळीं जो कायदा अमलांत असेल त्या कायद्याअन्वयें ब्रिटिश हिंदुस्थानांत नोंदलेलें: "नोंदलेलें."

(४८) "रेग्युलेशन" ह्मणजे सन १८७० च्या हिंदुस्थान सरकारच्या आक्टाअन्वयें केलेला रेग्युलेशन: "रेग्युलेशन."

(४९) "कानू" ह्मणजे कोणत्याही कायद्यावरून दिलेला अधिकार चालवून केलेला कानू आणि या शब्दांत कोणत्याही कायद्याअन्वयें कानू ह्मणून केलेल्या रेग्युलेशनचा समावेश होतो: "कानू."

(५०) "परिशिष्ट" याचा अर्थ, हा शब्द ज्या आक्टांत अथवा रेग्युलेशनांत असेल त्या आक्टाचें किंवा रेग्युलेशनचें परिशिष्ट असा होतो: "परिशिष्ट."

(५१) "शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट" या संज्ञेचा अर्थ सन १८७४ च्या शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणेचें शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट असा होतो: "शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट."

(५२) "कलम" या शब्दाचा अर्थ, ज्या आक्टांत अथवा रेग्युलेशनांत हा शब्द आला असेल त्या आक्टाचें किंवा रेग्युलेशनचें कलम असा होतो: "कलम."

"तारूं." (५३) "तारूं" या शब्दांत ज्या नावेचा उपयोग जलपर्यटनांत करण्यांत येत असून जी केवळ वल्ह्यानेंच चालविण्यांत येत नसेल अशा हरेक प्रकारच्या नौकेचा समावेश होतो:

"सही." (५४) "सही" व व्याकरणाच्या संबंधानें या शब्दाचीं होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द यांत, ज्या मनुष्यास आपलें नांव लिहितां येत नसेल त्या मनुष्याच्या संबंधानें "निशाणी" व व्याकरणाच्या संबंधानें तिचीं होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द यांचा समावेश होतो.

"मुलगा." (५५) "मुलगा" या शब्दांत, ज्या मनुष्यास आपले शास्त्राप्रमाणें दत्तक घेण्याचा अधिकार आहे त्या मनुष्याचे बाबतींत, दत्तक मुलग्याचा समावेश होतो:

"पोटकलम." (५६) "पोटकलम" या शब्दाचा अर्थ, ज्या कलमांत हा शब्द येईल त्या कलमाचें पोटकलम असा होतो:

"आण." (५७) "आण" या शब्दाचीं व्याकरणाच्या संबंधानें होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द यांत, ज्या मनुष्यांस शपथेबद्दल प्रतिज्ञा किंवा इकरार करण्याची कायद्यावरून परवानगी असेल त्या मनुष्यांच्या बाबतींत, प्रतिज्ञा व इकरार यांचा समावेश होतो:

"किंमत." (५८) "किंमत" ह्या शब्दाचा उपयोग कोणत्याही दाव्याच्या संबंधानें केला असेल तेव्हां त्याचा अर्थ, दाव्यांची किंमत आकारण्यासंबंधीं विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें अजमासलेला सदर्हू दाव्याच्या विषयाचा ऐवज अगर किंमत :

"नाव." (५९) "नाव" या शब्दांत कोणतेंही तारूं अगर मचवा किंवा ज्याचा उपयोग जलपर्यटनांत करण्यांत येतो अशी दुसऱ्या कोणत्या प्रकारची नाव यांचा समावेश होतो:

"मृत्युपत्र." (६०) "मृत्युपत्र" या शब्दांत मृत्युपत्राचे पुरवणीचा व आपखुषीनें मालमिळकतीची मरणोत्तर वांटणी करण्याविषयीं केलेले सर्व लेख यांचा समावेश होतो:

"लिहिणें." (६१) "लिहिणें" या शब्दासंबंधी संज्ञांचा, त्यांमध्यें ठशांनीं छापणें, शिळा छापानें छापणें, फोटोग्राफी, आणि शब्द दर्शविण्याच्या किंवा ते जशाचे तसे उतरण्याच्या दुसऱ्या तऱ्हा यांजवरील हवाल्यांचा समावेश होतो असें समजून अर्थ केला पाहिजे : आणि

"वर्ष." (६२) "वर्ष" ह्मणजे ब्रिटिश क्यालेंडरप्रमाणें मोजलेलें वर्ष:

वरील व्याख्या पूर्वीच्या कायद्यांस लागू करणें. ४. (१) खालील शब्द व संज्ञा, ह्मणजे, "प्रतिज्ञा," "बारिस्टर," "ब्रिटिश हिंदुस्थान," "डिस्ट्रिक्ट [ जिल्हा ] जज्ज," "बाप," "हिंदुस्थान सरकार," "मलिका माआझमा" अथवा "राणी," "है कोर्ट" (या संज्ञेचा दिवाणी कामांच्या संबंधानें उपयोग केला असेल तेव्हां ती ) "स्थावर मिळकत," "कैद," "स्थानिक सरकार," "माजिस्ट्रेट," "महिना," "जंगम मिळकत," "शपथ," "मनुष्य," "कलम," "मुलगा," "आण," "मृत्युपत्र," आणि "वर्ष" यांच्या तिसऱ्या कलमांतील व्याख्या, विषयास किंवा पूर्वापर संबंधास बाध येत नसेल तर, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं तारीख ३ जानुआरी सन १८६८ नंतर केलेल्या सर्व आक्टांस आणि तारीख १४ जानुआरी सन १८८७ रोजीं किंवा त्यानंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहेत.

(२) खालील शब्द आणि संज्ञा ह्मणजे "साद्य करणें," "बाब," "सुरुवात," "सरकारी साल", "स्थानिक अधिकारी," "मास्तर," "अपराध," "भाग," "साधारण सर्व लोकांस पीडा," "नोंदलेलें," "परिशिष्ट," "तारूं," "सही," "पोटकलम," "किंमत," आणि "लिहिणें," यांच्या सदरील कलमांतील व्याख्या, विषयास किंवा पूर्वापर संबंधास बाध येत नसेल तर, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेल्या सर्व

आक्टांस आणि तारीख १४ जानुआरी सन १८८७ रोजीं किंवा त्यानंतर केलेल्या रेग्युलेशनांसही लागू आहेत.

### अर्थ करण्यासंबंधाचे सामान्य नियम.

५. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट जेव्हां अमुक विवक्षित दिवशीं अमलांत येईल असें ह्मटलेलें नसेल तेव्हां, तो ज्या दिवशीं गव्हर्नर जनरल यांकडून मंजूर करण्यांत येईल त्या दिवशीं अमलांत येईल. कायदे अमलांत येणें.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट जेव्हां, सन १८६१ चा हिंदुस्थानच्या कौन्सिलांबाबद आक्ट ह्याच्या २० व्या कलमाअन्वयें, त्या संबंधाची मलिका माआझमांची मंजुरी प्रदर्शित होण्यावर तहकूब ठेविलेला असेल तेव्हां, अधिक पुढची तारीख निर्दिष्ट केलेली नसल्यास, तो, मलिका माआझमांनीं पसंत केल्यास, ती पसंती योग्य रीतीनें प्रसिद्ध करण्यांत येईल त्या दिवशीं अमलांत येईल.

(३) उलट निर्दिष्ट केलेलें नसेल तर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट किंवा कोणताही रेग्युलेशन, त्याच्या सुरवातीच्या आधींचा दिवस संपल्याबरोबर अमलांत येईल असा त्याचा अर्थ करावा.

६. (१) आजपर्यंत केलेला किंवा ह्यानंतर करण्यांत येईल तो कोणताही कायदा ह्या आक्टाअन्वयें किंवा ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या हिंदुस्थान सरकारच्या कोणत्याही आक्टाअन्वयें अगर कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, रद्द करण्यांत येईल तेव्हां, उलट निर्दिष्ट केलेलें नसेल तर, त्याप्रमाणें तो कायदा रद्द केल्यावरून-- रद्द करणें व अमलांतून जाणें ह्यांचा परिणाम.

(१). तो रद्द करण्याचा ठराव अमलांत येईल त्या वेळेस अमलांत नसलेली किंवा अस्तित्वांत नसलेली अशी कोणतीही गोष्ट पुनः उपस्थित होणार नाहीं; अगर

(२) ह्याप्रमाणें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याच्या पूर्वीच्या अमलास किंवा त्या कायद्याअन्वयें योग्य रीतीनें केलेल्या किंवा भोगलेल्या कोणत्याही कृत्यास बाध येणार नाहीं; अगर

(३) ह्याप्रमाणें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याअन्वयें मिळविलेल्या, मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही हक्कास, अनन्यग्राह्याधिकारास, कर्तव्यतेस किंवा पात्रतेस बाध येणार नाहीं; अगर

(४) ह्याप्रमाणें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल प्राप्त झालेल्या कोणत्याही दंडाच्या, सरकारदाखल होण्याच्या किंवा शिक्षेच्या पात्रतेस बाध येणार नाहीं ;

(५) सदर्हू प्रकारच्या कोणत्याही हक्काबद्दलच्या, अनन्यग्राह्याधिकाराबद्दलच्या, कर्तव्यतेबद्दलच्या, पात्रतेबद्दलच्या, दंडाबद्दलच्या, सरकारदाखल होण्याबद्दलच्या अगर शिक्षेबद्दलच्या कोणत्याही चौकशीस, चालविलेल्या कायद्यासंबंधी कामास, किंवा इलाजास बाध येणार नाहीं;

आणि रद्द करणारा सदर्हू प्रकारचा आक्ट अगर रेग्युलेशन पसार न झाल्याप्रमाणेंच सदर्हू चौकशी, चालविलेलें कायद्यासंबंधी काम अगर इलाज करतां येईल, चालू ठेवतां येईल अगर अमलांत आणतां येईल, आणि सदर्हू प्रकारचा कोणताही दंड, सरकारदाखल करण्याचा ठराव अगर शिक्षा करतां येईल.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा जो कोणताही आक्ट किंवा जो कोणताही रेग्युलेशन केवळ विवक्षित मुदतीपर्यंत अमलांत असावा ह्मणून स्पष्ट ठरावाअन्वयें पहिल्यानेंच ठरविलें असल्याकारणानें, अमलांतून गेला असेल आणि जो कोणताही

आर्डिनन्स सन १८६१ चा हिंदुस्थानच्या कौन्सिलाबाबद आक्ट ह्याच्या २२ व्या कलमाअन्वयें केलेला व फर्मावलेला असून त्या कलमाअन्वयें अमलांतून गेला असेल, तो आक्ट, रेग्युलेशन किंवा आर्डिनन्स रद्द केलेला असल्याप्रमाणेंच त्यास पोटकलम (१) यांतील ठराव लागू होतील.

रद्द केलेले कायदे पुनः संस्थापित करणें.

७. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, कोणताही सर्वांशीं किंवा अंशतः रद्द झालेला कायदा सर्वांशीं किंवा अंशतः पुनः संस्थापित करण्याचें कारण असेल त्या बाबतींत, तें कारण स्पष्टपणें लिहिणें अवश्य आहे.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेरोजीं किंवा त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

रद्द केलेल्या कायद्यांवर दिलेल्या हवाल्यांचा अर्थ.

८. हा आक्ट किंवा ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेला गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट किंवा कोणताही रेग्युलेशन कोणत्याही पूर्वीच्या कायद्यांतील कोणताही ठराव रद्द करून फेरफारांनिशीं किंवा फेरफारांशिवाय पुनः ठरवील त्या बाबतींत, ह्याप्रमाणें रद्द केलेल्या ठरावावर कोणत्याही इतर कायद्यांत किंवा लेखांत दिलेले हवाले, निराळा उद्देश दिसत असेल तो प्रसंग खेरीजकरून इतर प्रसंगीं, सदर्हूप्रमाणें पुनः ठरविलेल्या ठरावांविषयीं आहेत असें समजून त्यांचा अर्थ करावा.

मुदतीची सुरवात व शेवट.

९. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, दिवसांच्या कोणत्याही मालिकेंतून किंवा दुसऱ्या कोणत्याही मुदतींतून पहिला दिवस वगळण्याच्या कारणासाठीं "पासून" शब्दाचा उपयोग केला असतां आणि दिवसांच्या कोणत्याही मालिकेंत किंवा दुसऱ्या कोणत्याही मुदतींत शेवटच्या दिवसाचा समावेश करण्याच्या कारणासाठीं "पर्यंत" शब्दाचा उपयोग केला असतां बस होईल.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

वेळ मोजणें.

१०. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, कोणतेंही कृत्य किंवा काम कोणत्याही कोर्टांत अगर कचेरींत विवक्षित दिवशीं किंवा ठरींव मुदतीच्या आंत करावें किंवा चालवावें ह्मणून फर्मावलेलें असेल अगर त्याबद्दल तशी परवानगी दिलेली असेल, त्या बाबतींत, तें कोर्ट अगर ती कचेरी त्या दिवशीं किंवा त्या ठरींव मुदतीच्या शेवटच्या दिवशीं बंद असल्यास, तें कृत्य अगर काम, तें कोर्ट अगर ती कचेरी तदनंतरच्या ज्या पुढच्या दिवशीं खुलें अगर खुली असेल त्या दिवशीं केल्यास अगर चालविल्यास तें योग्य वेळीं करण्यांत आलें अगर चालविण्यांत आलें असें समजलें पाहिजे.

मात्र, सन १८७७ चा हिंदुस्थानचा मुदतीचा आक्ट ज्या कोणत्याही कृत्यास किंवा कामास लागू आहे त्या कृत्यास किंवा कामास ह्या आक्टांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

(२) हें कलम, सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस व सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

अंतरें मोजणें.

११. ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाच्या अगर कोणत्याही रेग्युलेशनच्या कारणांसाठीं कोणतेंही अंतर मोजतांना, तें अंतर, निराळा उद्देश दिसत असेल ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, एका आडव्या सपाटीवर सरळ रेषेनें मोजलें पाहिजे.

कायद्यांमध्यें दिलेला ड्यूटीचा दर प्रमाणानें समजावा.

१२. हल्लीं अमलांत असणारे किंवा पुढें अमलांत येणारे कोणतेंही कायद्यावरून, कोणतेही मालाचे किंवा व्यापाराचे जिन्नसाचे कोणत्याही विवक्षित परिमाणावर, वजनाप्रमाणें, मापाप्रमाणें किंवा किंमतीप्रमाणें कस्टमची किंवा एक्सैसची ड्यूटी किंवा त्या प्रकारची दुसरी कोणतीही जकात घेतां येत असेल तेव्हां, त्याच दरानें तशीच जकात अधिक किंवा कमी मालावर घेतां येईल.

लिंग व वचन.

१३. (१) पुल्लिंगी शब्दांत स्त्रियांचा समावेश होतो असें समजावें.

(२) एकवचनी शब्दांत बहुवचनाचा समावेश होतो आणि बहुवचनी शब्दांत एकवचनाचा समावेश होतो.

### अधिकार व कामदार.

सरकारास दिलेले अधिकार वेळोवेळीं चालविणें.

१४. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें सरकारास कोणताही अधिकार दिलेला असेल तेव्हां, तो अधिकार प्रसंग पडेल त्याप्रमाणें वेळोवेळीं चालविण्याचा अख्त्यार आहे.

(२) हें कलम सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस व सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

नेमणूक करण्याच्या अधिकारांत, हुद्याच्या नात्यानें नेमणूक करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

१५. ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें कोणत्याही मनुष्यास कोणत्याही हुद्यावर किंवा कोणतेंही काम करण्यासाठीं नेमण्याचा अधिकार दिलेला असेल, तेव्हां, स्पष्ट रीतीनें निराळें ठरविलेलें असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, अशी कोणतीही नेमणूक नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें करण्याचा अधिकार असेल.

नेमणूक करण्याच्या अधिकारांत सस्पेंड करण्याच्या किंवा बर्तर्फ करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

१६. गव्हर्नर जनरलाच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, कोणतीही नेमणूक करण्याचा अधिकार दिलेला असेल, तेव्हां, निराळा उद्देश दिसून येईल ते प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं, ती नेमणूक करण्याचा अधिकार असलेल्या अधिकाऱ्यास, त्यानें तो अधिकार चालवून ज्या मनुष्याची नेमणूक केलेली असेल, त्या मनुष्यास सस्पेंड अगर बर्तर्फ करण्याचाही अख्त्यार असेल.

एका अधिकाऱ्याचे जागेवर दुसरा अधिकारी नेमणें.

१७. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, कोणत्याही हुद्याचीं कामें त्या त्या वेळीं करीत असलेल्या प्रत्येक मनुष्यास किंवा कित्येक मनुष्यांस कोणताही कायदा लागू आहे असें निर्दिष्ट करण्याच्या कारणासाठीं, तीं कामें हल्लीं जो अधिकारी चालवीत असेल किंवा तीं कामें जो अधिकारी सामान्यतः चालवीत असेल, त्याच्या हुद्याचें नांव सांगितलें म्हणजे पुरें होईल.

(२) हें कलम, सन १८३८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस आणि सन १८८७ च्या

जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

स्थानापन्न.

१८. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, कोणतेही कामदारांचे किंवा ज्या मंडळ्यांतील सभासदांच्या जागा कधीं रिकाम्या पडत नाहींत त्या मंडळ्यांचे स्थानापन्नांशीं कोणत्याही कायद्याचा संबंध दर्शविण्याच्या कारणासाठीं, त्या कायद्याचा त्या कामदारांशीं अगर मंडळ्यांशीं असलेला संबंध सांगितला ह्मणजे बस होईल.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

मुख्य अधिकारी व त्यांचे ताब्यांतील अमलदार.

१९. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, कोणतेही हुद्याचे मुख्यासंबंधाचा किंवा वरिष्ठासंबंधाचा कायदा, जे डेप्युटी किंवा ताब्यांतील अमलदार आपल्या मुख्याच्याबदला त्या हुद्याचीं कामें कायदेशीर रीतीनें चालवीत असतील त्यांस लागू आहे असें सांगण्याच्या कारणासाठीं, त्या वरिष्ठाचीं कामें लिहिलीं असतां बस होईल.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

## कायद्यांअन्वयें केलेले हुकुम, कानू, इत्यादिकांच्या संबंधाचे ठराव.

कायद्यांअन्वयें काढलेल्या हुकुम वगैरेचा अर्थ करणें.

२०. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें कोणताही लेख ह्मणजे कोणताही हुकुम, वारंट, व्यवस्थापत्रक, कानू किंवा पोटकायदा करण्याचा अधिकार दिलेला असेल, तेव्हां, तो लेख ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर फर्माविलेला असल्यास, त्या लेखांत उपयोग केलेल्या संज्ञांचे अर्थ, विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर, तो अधिकार देणाऱ्या आक्टांत किंवा रेग्युलेशनांत त्या संज्ञांस जे जे अर्थ दिलेले असतील तेच तेच असतील.

हुकुम, कानू अगर पोटकायदे करण्यास दिलेल्या अधिकारांत त्या हुकुमांत कानूंत अगर पोट कानूंत जास्त मजकूर घालण्याच्या, ते सुधारण्याच्या, त्यांत फेरफार करण्याच्या अगर ते रद्द करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

२१. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, कोणतेही हुकुम, कानू अगर पोटकायदे करण्याचा अधिकार दिलेला असेल तेव्हां, त्या अधिकारांत, ह्याप्रमाणें केलेल्या कोणत्याही हुकुमांत कानूंत अगर पोटकायद्यांत जास्त मजकुर घालण्याच्या, ते सुधारण्याच्या, त्यांत फेरफार करण्याच्या अगर ते रद्द करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो; मात्र हा अधिकार त्या दिलेल्या अधिकाराप्रमाणेंच चालवावयाचा असून, तशाच मंजुरीस व शर्ती असल्यास त्यांस पात्र राहील.

कायदा ठरणें व सुरू होणें यांच्या दरमियान कानू अगर पोट कायदे करणें आणि हुकुम फर्माविणें.

२२. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा जो कोणताही आक्ट किंवा जो कोणताही रेग्युलेशन ठरल्यानंतर लागलाच अमलांत यावयाचा नसेल त्या आक्टावरून किंवा रेग्युलेशनवरून जेव्हां, तो आक्ट किंवा रेग्युलेशन लागू होण्याच्या संबंधानें, किंवा त्या आक्टाअन्वयें कोणतेंही कोर्ट किंवा कचेरी स्थापण्याच्या किंवा त्याअन्वयें कोणताही जज्ज किंवा अमलदार नेमण्याच्या संबंधानें, किंवा त्या आक्टाअन्वयें अगर रेग्युलेशनअन्वयें कोणतीही गोष्ट कोणत्या मनुष्यानें अगर कोणत्या वेळीं अगर कोणत्याजागीं अगर कोणत्या रीतीनें अगर कोणती फी घेऊन करावयाची त्यासंबंधानें कानू अगर पोटकायदे करण्याचा किंवा हुकुम फर्मावण्याचा अधिकार दिलेला असेल, तेव्हां, तो अधिकार, तो आक्ट अगर रेग्युलेशन ठरल्यानंतर कोणत्याही वेळीं चालविण्याचा

अखत्यार आहे; परंतु ह्याप्रमाणें केलेल्या कानू व पोटकायदे अगर फर्माविलेले हुकुम, तो आक्ट अगर रेग्युलेशन सुरू होई तोंपर्यंत अमलांत येणार नाहींत.

२३. गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टावरून किंवा कोणत्याही रेग्युलेशनवरून, कानू अगर पोटकायदे करण्याचा अधिकार, ते पूर्वी प्रसिद्ध करून मग ठरवावे अशा शर्तीवर स्पष्टपणें दिला असेल तेव्हां खालील ठराव लागू होतीलः ते येणेंप्रमाणेंः— पूर्वी प्रसिद्ध करून कानू अगर पोटकायदे ठरवणें या गोष्टीस लागू असणारे ठराव.

(१) ते कानू अगर पोट कायदे करण्याचा अखत्यार असणाऱ्या अधिकाऱ्यानें, ते करण्यापूर्वी, योजिलेल्या कानूंचा अगर पोटकायद्यांचा मसुदा, ते कानू अगर पोटकायदे ज्या मनुष्यांस लागू होण्याचा संभव असेल त्या मनुष्यांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केला पाहिजे ;

(२) सदर्हू मसुदा प्रसिद्ध करणें तो त्या अधिकाऱ्यास पुरेशी वाटेल त्या रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे, किंवा, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल अगर स्थानिक सरकार जी रीत सांगेल त्या रीतीनें प्रसिद्ध करावा असें पूर्वी प्रसिद्ध करण्याबद्दलच्या शर्तीवरून अवश्य असेल तर, तशा रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे ;

(३) सदर्हू मसुद्याबरोबर एक नोटीस प्रसिद्ध करून, तींत, कोणत्या तारखेस किंवा कोणत्या तारखेनंतर त्या मसुद्याचा विचार करण्यांत येईल तें सांगितलें पाहिजे ;

(४) सदर्हूप्रमाणें निर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी त्या मसुद्याबाबद कोणत्याही मनुष्याकडून जी कोणतीही हरकत किंवा सूचना, ते कानू अगर पोटकायदे करण्याचा अखत्यार असलेल्या अधिकाऱ्याकडे येईल, तिचा विचार ते कानू अगर पोटकायदे करण्याचा अखत्यार असलेल्या त्या अधिकाऱ्यानें, आणि जेव्हां ते कानू अगर पोटकायदे दुसऱ्या अधिकाऱ्याच्या मंजुरीनें, पसंतीनें किंवा संमतीनें करावयाच्या असतील तेव्हां तशा दुसऱ्या अधिकाऱ्यानेंही केला पाहिजे.

(५) पूर्वी प्रसिद्ध करून मग कानू अगर पोटकायदे करण्याचा जो अधिकार तो चालवून केलेला ह्मणून असलेला कोणताही कानू अगर पोटकायदा गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत आला ह्मणजे तें कृत्य, तो कानू अगर पोटकानू योग्य रीतीनें केला असल्याबद्दल निरुत्तर पुरावा होईल.

२४. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट किंवा कोणताही रेग्युलेशन, ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर रद्द करण्यांत येऊन फेरफारांनिशीं किंवा फेरफारांशिवाय पुनः ठरविण्यांत येईल, तेव्हां, उलट स्पष्ट रीतीनें ठरविलें असेल ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, त्या रद्द केलेल्या आक्टाअन्वयें अगर रेग्युलेशनअन्वयें फर्मावलेला कोणताही लेख ह्मणजे कोणताही हुकुम, वारंट, योजनापत्रक, कानू अगर पोटकायदा, त्याच्या बदला, सदर्हू प्रमाणें पुनः ठरविलेल्या ठरावाअन्वयें कोणताही लेख फर्माविलेला नसल्यास किंवा फर्माविण्यांत येई तोंपर्यंत, त्या पुनः ठरविलेल्या ठरावांस विरुद्ध नसेल तितक्या अंशानें, अमलांत राहील. रद्द करून पुनः ठरविलेल्या कायद्यांअन्वयें केलेले हुकुम वगैरे चालू असणें.

## किरकोळ.

२५. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा याचीं कलमें ६३ ते ७०, आणि दंड वसूल करण्याकरितां वारंटें काढण्याबाबदचे व तीं बजावण्याबाबदचे त्या त्या वेळीं अमलांत असलेले फौजदारी काम चालविण्याच्या रीतीच्या कायद्याचे ठराव, कोणत्याही आक्टांत, रेग्युलेशनांत, कानूंत अगर पोटकायद्यांत उलट स्पष्ट दंड वसूल करणें.

ठराव असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, त्या आक्टाअन्वयें, रेग्युलेशनाअन्वयें कानूअन्वयें अगर पोटकायद्याअन्वयें केलेल्या सर्व दंडांस लागू होतील.

दोन अगर जास्त कायद्यांअन्वयें शिक्षा करण्यास पात्र अशा अपराधाबद्दल ठराव.

२६. कोणतेंही कृत्य किंवा वर्जन दोन अगर जास्त कायद्यांअन्वयें अपराध होत असेल तेव्हां, अपराधी, त्या दोन किंवा अधिक कायद्यांपैकीं कोणत्याही कायद्याअन्वयें फौजदारींत काम चालविलें जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र होईलः मात्र तो एकाच अपराधाबद्दल दोनदां शिक्षा केली जाण्यास पात्र होणार नाहीं.

पोस्टाच्या द्वारें बजावणें याचा अर्थ.

२७. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टावरून किंवा कोणत्याही रेग्युलेशनवरून कोणताही दस्तऐवज पोस्टानें बजाविण्याविषयीं अधिकार दिलेला असेल अगर हुकुम केलेला असेल, आणि त्यासंबंधानें "बजावणें" हा शब्द किंवा "देणें" अगर "पाठविणें" यांपैकीं कोणताही शब्द किंवा इतर कोणतीही संज्ञा वापरलेली असेल, तेव्हां, ती बजावणी ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केली तर तो, उलट उद्देश दिसून येत नसल्यास, तो दस्तऐवज आंत घातलेल्या पाकिटावर योग्य पत्ता लिहून तें आगाऊ हांशील भरून रजिस्टर करून पोस्ट केलें असतां करण्यांत आली आहे असें, आणि, उलट सिद्ध करण्यांत येईल ते प्रसंग शिवायकरून इतर प्रसंगीं, तें पाकिट पोस्टाच्या नेहमींच्या क्रमाप्रमाणें ज्या वेळीं स्वाधीन केलें जाईल त्या वेळीं करण्यांत आली आहे असें समजलें पाहिजे.

कायद्यांचा उल्लेख करणें.

२८. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, आणि अशा कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा रेग्युलेशनअन्वयें किंवा त्यासंबंधानें केलेल्या कोणत्याही कानूंत, पोटकायद्यांत, लेखांत किंवा दस्तऐवजांत कोणत्याही कायद्याचा उल्लेख करणें तो त्यास दिलेल्या सरनाम्यावर किंवा लहान सरनाम्यावर (असल्यास) हवाला देऊन अगर त्याच्या नंबरावर व वर्षावर हवाला देऊन केला असतां चालेल; आणि कोणत्याही कायद्यांतल्या कोणत्याही ठरावाचा उल्लेख करणें तो, त्या कायद्याच्या ज्या कलमांत किंवा पोटकलमांत तो ठराव असेल त्या कलमावर किंवा पोटकलमावर हवाला देऊन केला असतां चालेल.

(२) ह्या आक्टांत आणि ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत दुसऱ्या एकाद्या कायद्याच्या कोणत्याही भागाचें कोणतेंही वर्णन किंवा उल्लेख केलेला असेल, त्याचा अर्थ करतांना त्यांत, निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, त्या वर्णन किंवा उल्लेख केलेल्या भागांच्या सुरवातीचा ह्मणून किंवा शेवटचा ह्मणून जो शब्द, किंवा कलम किंवा भाग सांगितलेला असेल त्या शब्दाचा, कलमाचा किंवा भागाचा समावेश होतो असें समजून अर्थ केला पाहिजे.

पूर्वीचे कायदे, कानू व पोट कायदे यांचा बचाव.

२९. ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या आक्टांच्या, रेग्युलेशनांच्या, कानूंच्या अगर पोट-कायद्यांच्या अर्थासंबंधाचे जे ह्या आक्टाचे ठराव, त्यांवरून, ह्या आक्टाच्या सुरवातीपूर्वी केलेल्या कोणत्याही आक्टाच्या, रेग्युलेशनच्या, कानूंच्या अगर पोट-कायद्याच्या अर्थास बाध येणार नाहीं; मग तो आक्ट, रेग्युलेशन, कानू अगर पोटकायदा, ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या एकाद्या आक्टाअन्वयें, रेग्युलेशनअन्वयें, कानूअन्वयें अगर पोट-कायद्याअन्वयें चालू ठेविलेला किंवा सुधारलेला असला तरी चालेल.

---

## परिशिष्ट.

### रद्द केलेले कायदे.

(कलम २ पहा.)

| वर्ष. | नंबर. | सरनामा अगर विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|---|
| १८६८ | १ | सन १८६८ चा सामान्य कलमांचा आक्ट. | सगळा. |
| १८७२ | १ | सन १८७२ चा हिंदुस्थानचा पुराव्याचा आक्ट. | सन १८६८ चा आक्ट १ ला ह्या-संबंधाचा आहे तेवढा. |
| १८८७ | १ | सन १८८७ चा सामान्य कलमांचा आक्ट. | सगळा. |
| १८९१ | १२ | सन १८९१ चा रद्द करण्याबाबदचा व सुधारण्या-बाबदचा आक्ट. | सन १८६८ चा आक्ट १ ला ह्या-संबंधाचा आहे तेवढा. |

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

हा मसुदा, कायद्यांत कोणतेही फेरफार करण्यासाठीं योजिलेला नसून, त्याचा उद्देश, त्यावरून जे आक्ट एकत्र केलेले आहेत त्यांप्रमाणेंच, कायद्यांची भाषा जास्त आटोपसर करणें, आणि विषय एकच असेल तेथें सारखी भाषा वापरण्याची तजवीज करणें हा आहे.

२. ह्या प्रकारचा पहिला कायदा ह्मटला ह्मणजे लार्ड ब्रौहामचा आक्ट (१३ व १४ व्हिक्टोरिया, चाप्टर २१) होय. त्या स्टाट्यूटांतल्या ठरावांत हिंदुस्थानास लागू होण्यासारखे कांहीं फेरफार करून व ते थोडेसे विस्तृत करून सामान्य कलमांचा आक्ट (सन १८६८ चा १ ला) करण्यांत आला, आणि तेंच तत्त्व जास्त लागू करून, सामान्य कलमांचा आक्ट (सन १८८७ चा १ ला) हा पसार करण्यांत आला. आतां, कायद्यांतील शब्दांचा कोश ज्यास ह्मणतां येईल तो सगळा एका कायद्यांत यावा, आणि सदरीं निर्दिष्ट केलेले दोन आक्ट एकत्र करावे ही गोष्ट उघड-पणें इष्ट असून, ही संधि साधून, जो मजकूर जास्त दाखल करावा ह्मणून आलीकडील अनुभवावरून सुचलें आहे तो दाखल करणें आणि विशेषेंकरून, सन १८८९ चा अर्थ करण्याबद्दलचा आक्ट (५२ व ५३ व्हिक्टोरिया, चाप्टर ६३) ह्यांतील हिंदुस्थानास लागू असणारे ठराव सामील करणें, इष्ट दिसत आहे. सदहू स्टाट्यूट, सन १८८७ च्या हिंदुस्थानच्या आक्टाप्रमाणेंच, सर. सी. इल्बर्ट यांनीं तयार केला, आणि तो, एकंदरींत पहातां, सदहू हिंदुस्थानचा आक्ट काळजीपूर्वक तपासून व जास्त विस्तृत करून तयार केलेला दिसतो. उदाहरणार्थ, सदहू इंग्लिश आक्टां-तील "ब्रिटिश हिंदुस्थान" याची व्याख्या, सन १८६८ च्या हिंदुस्थानच्या आक्टांतील व्याख्या नुस्ती विस्तृत करून दिलेली आहे. त्या इंग्रजी कायद्यांतील व्याख्येचा कायदेशीर अर्थ तोच आहे, परंतु, ती व्याख्या जास्त सम-जण्यासारखी असून तींत दुसऱ्या स्टाट्यूटावर हवाला दिलेला नाहीं. ह्या योजिलेल्या कायद्यापासून असा आणखी एक फायदा होईल कीं, त्याच्या योगानें एकाच प्रकारच्या विषयाच्या मजकुराच्या बाबतींत हिंदुस्थानांतल्या व इंग्लंडांतल्या कायद्यांची भाषा सारखी होत जाऊन त्यांचा अर्थही एकाच तऱ्हेनें करतां येईल.

३. मसुद्याच्या रकान्यांत दिलेले हवाले, त्या मसुद्यांतल्या दरेक ठरावास असलेला आधार दर्शविण्यासाठीं दिले आहेत, आणि याशिवाय जो खुलाशाचा तपशील देणें जरूर दिसलें तो याखालीं रकमांच्या संबंधाच्या ज्या टीपा दिलेल्या आहेत, त्यांत दिलेला आहे.

तारीख २ फेब्रुआरी सन १८९७.

एम्. डी. चालमर्स.

---

### रकमांसंबंधाच्या टीपा.

**रकम ३.**—ह्या रकमेंत, हिंदुस्थानांतल्या कायद्यांमध्यें कमजास्त मानानें पुष्कळ वेळां येणारे बासष्ट शब्द व संज्ञा एकत्र करून त्यांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. ह्यांची व्यवस्था विल्हेवारीनें केलेली आहे, आणि त्या व्यवस्थेस

अनुसरून व त्याचप्रमाणें, नजरचूक होऊं नये ह्मणून, "बाप" व "मुलगा" यांच्या व्याख्या, आणि "प्रतिज्ञा," "शपथ" व "आण" ह्या एकजातीय शब्दांच्या व्याख्या निरनिराळ्या करून त्यांतली प्रत्येक तिच्या योग्य ठिकाणीं दिली आहे.

रकम ३ (७).—ब्रिटिश हिंदुस्थानाची व्याख्या, सदरीं हेतु व कारणें ह्यांच्या निरूपणांत सांगितलें आहे त्याप्रमाणें, सन १८८९ च्या अर्थ करण्याबाबदच्या ॲक्टांतून [ ५२ व ५३ व्हिक्टोरिया, चाप्टर ६३, कलम १८ (४)] घेतली आहे.

रकम ३ (१७).—ह्या रकमेंतली "कायदा" ह्याची व्याख्या, त्या शब्दाच्या अर्थसंबंधानें वेळोवेळीं शंका निघालेल्या आहेत त्यांचें निरसन करण्यासाठीं दिलेली आहे.

रकम ३ (२०).—"गॅझेट" शब्दाची व्याख्या चालू वहिवाटीप्रमाणें केलेली आहे. पुष्कळ कायद्यांतील ठरावांची भाषा आटोपसर व सुलभ करण्याच्या कामीं ह्या व्याख्येचा उपयोग होईल.

रकम ३ (२१).—ही व्याख्या, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्यांतील व्याख्येहून बरीच भिन्न आहे, ही गोष्ट लक्षांत येईल. परंतु अशी समजूत आहे कीं, ही "इमानानें" शब्दाची व्याख्या जास्त बरोबर व वाजवी असल्या कारणानें ती जास्त बरी आहे. ही व्याख्या आतां इंग्लंडामध्यें चांगली चालू झाली आहे, कारण, लॉर्ड डेनमन, सी. जे., यांनीं सन १८३६ इतक्यापाठीमागें गुडमन विरुद्ध हार्वे (४ ए. अॅण्ड इ. ८७६ च्या पृष्ठावर) या खटल्यांत ह्मटलें आहे त्याप्रमाणें "अतिशयित हयगय ही बेइमानपणाचा पुरावा असूं शकेल, परंतु तीं दोन्ही एकच नाहींत. त्या परस्पर विरोधी अशा तत्त्वाच्या शेवटच्या अवशेषाचा आह्मीं त्याग केला आहे." (त्याच-प्रमाणें, जोन्स विरुद्ध गॉर्डन, लॉ. रि. २ अपील केसी ६२९, आणि डरी विरुद्ध पीक, लॉ. रि. १४, अपील केसी ३३७ पहा.) इमानानें आणि हयगय न करितां वागणाऱ्या मनुष्याचा मात्र बचाव व्हावा असा जर उद्देश आहे, तर तसें स्पष्टपणें ह्मणणें बरें दिसतें.

रकम ३ (२२).—"सरकार" ह्या संज्ञेची व्याख्या ठरविणें इष्ट आहे असें अनुभवावरून दिसून आलें आहे. फक्त हिंदुस्थान सरकार ह्मणावयाचें असेल तेव्हां "गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल" असें विशिष्ट रीतीनें ह्मणावें, आणि ताब्यांतील आड्मिनिस्ट्रेशनचा उल्लेख करावयाचा असेल तेव्हां "स्थानिक सरकार" असें विशिष्ट रीतीनें ह्मणावें, अशी हल्लींची वहिवाट आहे. परंतु, वारंवार, उदाहरणार्थ, सरकारी मिळकतीसंबंधाच्या ठरावांत, नुसता "सरकार" हा सामान्य शब्द वापरणें उपयोगी असतें; आणि अशा वेळीं, त्या संज्ञेंत, संबंध असलेल्या स्थानिक सरकारचा व त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकाराचाही समावेश होतो कीं काय, असा प्रश्न अनेक वेळां उत्पन्न झाला आहे. ह्मणून दिवाणी काम चालविण्याच्या कायद्यांत "सरकार" शब्दाची जी व्याख्या आधींच दिलेली आहे ती ह्या मसुद्यांत दाखल करून, असें स्पष्टपणें ठरविण्याचा विचार केला आहे कीं, संदर्भावरून निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, त्या शब्दांत सदरहूप्रमाणें दोन्हो सरकारांचा समावेश होतो असें समजावें.

रकम ३ (२६).—सामान्य कलमांचा ॲक्ट (सन १८६८ चा १ ला) ह्याचें कलम २ (११) ह्यांत "हाय कोर्ट" याची जी व्याख्या दिलेली आहे, ती दिवाणी कामाच्या संबंधानें मात्र आहे. यास्तव, फौजदारी कामाच्या संबंधाची त्या संज्ञेची व्याख्या, फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, कलम ४ (ऐ) ह्यांत दिलेली आहे ती घेऊन या मसुद्यांत सामील केली आहे.

रकम ३ (२८).—"हिंदुस्थान" शब्दाची ही व्याख्या, सन १८८९ चा अर्थकरण्याबाबद ॲक्ट, कलम १८ (५) यांतून जशीच्या तशीच उतरून घेतली आहे.

रकम ३ (४७)—"नोंदलेलें" ह्या शब्दाची जी हल्लींची व्याख्या, सामान्य कलमांचा ॲक्ट (सन १८८७ चा १ ला) ह्याच्या ३ (११) ह्या कलमांत दिलेली आहे, तींत "एकाद्या दस्तऐवजासंबंधानें वापरला असेल" हे शब्द आणि त्याचप्रमाणें "ब्रिटिश हिंदुस्थान" हे शब्द दाखल करून, ती नवीन व्याख्या, सदरहू मसुद्याचें कलम ४ (२) ह्याअन्वयें, सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या १४ व्या तारिखेनंतर करून दिलेल्या सर्व दस्तऐवजांस लागू आहे असें ठरविलें आहे. तथापि, हे जे जास्त शब्द दाखल केले आहेत त्यांवरून, सन १८८७ सालच्या ॲक्टांतील व्याख्येचा करावयाचा वाजवी अर्थ जास्त बिनचूक रीतीनें व्यक्त मात्र होतो, आणि ह्मणून त्यांमुळें कायद्यांत काहीं फेरफार होईल असें ह्मणतां येत नाहीं. . . . . . . . . . . . . . . . . .

रकम ३ (९७).—सामान्य कलमांचा आक्ट (सन १८६८ चा १ ला) याचें कलम २ (१७) यांत "प्राण" ह्या शब्दाची जी व्याख्या दिलेली आहे, तींत, " व्याकरणाच्या संबंधानें त्याचीं होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द " हे शब्द दाखल केले आहेत; परंतु कायद्याचा ह्याचप्रमाणें नेहमीं अर्थ करण्यांत येत असतो यांत संशय नाहीं.

रकम ३ (९८).—यांतही, हल्लींचा आक्ट (सन १८८७ चा १ ला) याच्या ३ (१३) कलमांतील व्याख्या थोडीशी विस्तृत केली आहे; परंतु त्यामुळें मूळ व्याख्येचा भावार्थ बदलतो असें वाटत नाहीं.

रकम ३ (६०).—सामान्य कलमांचा आक्ट (सन १८६८ चा १ ला) ह्याचें कलम २ (१६) यांतील " मृत्युपत्र " याची व्याख्या पुनः ठरवितेवेळीं तींत " वांटणें " ह्या शब्दाच्या बदला " व्यवस्था " हा शब्द दाखल करणें योग्य दिसल्यावरून तसें केलें आहे. ती व्याख्या करणाराचा उद्देश वांटणें शब्दापेक्षां व्यवस्था शब्दावरून जास्त बिनचूक रीतीनें व्यक्त होईल.

रकम ३ (६१).—सामान्य कलमांचा आक्ट (सन १८८७ चा १ ला) कलम ३ (१४) यांत दिलेल्या " लिहिणें " ह्याच्या व्याख्येच्या बदला सन १८८९ चा अर्थ करण्याबाबदचा आक्ट (५२ व ५३ व्हिक्टोरिया, चाप्टर ६३, कलम २०) यांतील व्याख्या दाखल करण्याचें यांत योजिलें आहे. इंग्लिश आक्टांतील व्याख्या हिंदुस्थानच्या आक्टांतील व्याख्येहून जास्त संपूर्ण व स्पष्ट आहे, परंतु, व्यवहारांत, हिंदुस्थानांतील आक्टांतल्या व्याख्येचा अर्थ, नेहमीं, इंग्लिश आक्टांतील व्याख्येप्रमाणेंच करण्यांत आलेला आहे अशी समजूत आहे.

रकम ४.—ही रकम हल्लींच्या कायद्याचा विशेष खुलासा होण्याकरितां दाखल केलेली आहे. पहिल्या पारिग्राफांत असा ठराव आहे कीं, गेल्या शेवटल्या रकमेंतील ज्या व्याख्या सामान्य कलमांचा आक्ट (सन १८६८ चा १ ला) यांतून उतरून घेतलेल्या आहेत, त्या, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे जे आक्ट सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर (ह्या तारखेस सदहू आक्टास गव्हर्नर जनरल यांची पसंती मिळाली) पसार केलेले असतील त्या सर्व आक्टांस आणि जे (रकम ३ यांत व्याख्या केलेले) रेग्युलेशन सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेनंतर (ह्या तारखेस सन १८८७ चा सामान्य कलमांचा आक्ट ह्यास गव्हर्नर जनरल ह्यांची पसंती मिळाली; ह्या आक्टाचें १० वें कलम येथें पहावें) केले असतील त्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहेत; त्याचप्रमाणें, त्या रकमेच्या २ ऱ्या पारिग्राफांत असें ठरविलें आहे कीं, रकम ३ ह्यांतल्या व्याख्या, म्हणजे ज्या सामान्य कलमांचा आक्ट (सन १८८७ चा १ ला) ह्यांत हल्लीं आहेत त्या, तो आक्ट अमलांत आल्याच्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस व सर्व रेग्युलेशनांसही लागू व्हावेत. हल्लींच्या व्याख्यांमध्यें जे काहीं फेरफार केलेले आहेत, त्यांसंबंधानें सदरील टिपांमध्यें उल्लेख केलेलाच आहे, आणि त्या व्याख्यांचा भावार्थ कोणत्याही बाबतींत कमजास्त केलेला नाहीं, ही गोष्ट, चांगल्या रीतीनें खुलासा करून सांगितली आहे असा भरंवसा आहे. ह्या प्रकारचेच खुलाशाचे ठराव, जरूर होती तेथें, सदहू मसुद्याच्या इतर ठरावांस जोडलेले आहेत.

रकम ५.—ह्याचा पहिला व दुसरा पारिग्राफ, त्या विषयाच्या संबंधाचा जो हल्लीं चालू कायदा आहे, त्या कायद्यांतील ठराव ज्या वहिवाटीस आधारभूत आहेत, त्या वहिवाटीचा खुलासा करण्यासाठीं योजिले आहेत. आणि तिसऱ्या पारिग्राफाचा आधार, सन १८८९ चा अर्थ करण्याबाबद आक्ट (५२ व ५३ व्हिक्टोरिया, चाप्टर ६३) ह्याच्या ३६ (२) कलमांमध्यें सांपडेल.

रकमा ६ (१) व ८.—ह्या, नुकताच ज्याचा उल्लेख केला आहे त्या इंग्लिश आक्टांतून घेतल्या आहेत, आणि, कायद्यांत वापरलेली भाषा आटोपसर करण्याच्या कामीं त्या कितपत उपयोगी पडतील त्याची फोड करून सांगण्याची जरूरी नाहीं. सन १८६१ चा हिंदुस्थानच्या कौन्सिलांबाबद आक्ट (२४ व २५ व्हिक्टोरिया, चाप्टर ६७) ह्याच्या २३ व्या कलमाअन्वयें करून फर्माविलेल्या हंगामी आर्डिनन्सच्या बाबतींत, आणि उत्तर ब्रह्मदेशांतील फौजदारी न्यायासंबंधाचा कायदा (सन १८८६ चा ७ वा) ह्यासारखे जे कायदे केवळ विवक्षित मुदतीपर्यंत अमलांत असावयाचे असतात अशा कायद्यांच्या बाबतींत उपयोगी पडण्याकरितां, रकम ६ हींत दुसरा पारिग्राफ जास्त दाखल करावा अशी सूचना झाल्यावरून तो दाखल करण्यांत आला आहे. कोणताही कायदा अमलांतून गेल्याचा परिणाम, तो रद्द केल्याप्रमाणेंच व्हावा, जास्त होऊं नये हें स्पष्ट आहे.

रकम १३.—ह्या रकमेंतील ठराव सामान्य कलमांचा आक्ट (सन १८६८ चा १ ला) ह्यांत "व्याख्यां"च्या रूपानें दिलेले आहेत, परंतु ते, अर्थ करण्याच्या कानूंच्या रूपानें ठरविले जावे हें जास्त योग्य दिसतें.

**रकम १५.**---ह्या देशांत, कायदे तयार करण्याच्या बाबतींत, आजपर्यंतची अशी वहिवाट असल्याचें दिसतें कीं, कोणत्याही नेमणुकी हुद्याच्या नात्यानेंही करूं देण्याचा इरादा असला, तर कोणत्याही मनुष्यास "नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें" नेमतां येईल असें दरेक आक्टांत स्पष्ट रीतीनें सांगावें. ह्याचा अर्थ असा केला जाण्याचा संभव आहे कीं, कोणत्याही मनुष्याची नेमणूक हुद्याच्या नात्यानें करण्याचा अधिकार, ती नेमणूक ज्या कायद्याअन्वयें केलेली असेल त्या कायद्यांत स्पष्ट रीतीनें दिलेला असल्याखेरीज, त्याला त्याप्रमाणें नेमतां यावयाचें नाहीं. ह्या मसुद्यांत दर्शविल्याप्रमाणें सदहू ठराव सामान्य रीतीनें लागू करावा हें, कारभार चालविण्याच्या दृष्टीनें, फार सोइस्कर होईल.

**रकम १६.**—साधारणपणें ह्मटलें ह्मणजे, कोणत्याही मनुष्याची नेमणूक करण्याच्या अधिकारांत त्याला त्या नेमणुकीपासून दूर करण्याच्या अधिकाराचा समावेश झाला पाहिजे. परंतु हिंदुस्थानांतील आक्टांमध्यें हे दोन्ही अधिकार स्पष्टपणें देण्याची वहिवाट असल्यामुळें, विशेषेंकरून, सर्वच कोर्टें सदहू प्रकारचा अर्थ मान्य करितील याची खातरी नाहीं. ह्मणून, तसा नियम ठरवून टाकण्यासाठीं ही संधि साधली आहे.

**रकम २०.**—असें ह्मणतात कीं, ह्या ठरावासारखा ठराव नसला तरी, येथें घालून दिलेला नियम लागू होईल. तथापि, सदहू इंग्लिश स्टाच्यूटास अनुसरून सन १८८९ चा अर्थ करण्याविषयींचा आक्ट यांतील ३१ वें कलम, जरूरीच्या फेरफारांनिशीं, उतरून घेणें इष्ट दिसतें. मद्रास सरकारानें, ह्या प्रकारचा अगदीं आलीकडचा असा जो कायदा झाला आहे त्यांत, ह्मणजे, मद्रासचा सामान्य कलमांचा आक्ट (सन १८९१ चा १ ला) कलम १० यांत, ह्याप्रमाणें आधींच केलेलें आहे.

**रकम २१.**—कायद्यानें दिलेले अधिकार चालवून एकदां केलेल्या कानूंत जास्त मजकूर घालण्याचा, त्या सुधारण्याचा, त्यांत फेरफार करण्याचा व त्या रद्द करण्याचा अधिकार, हिंदुस्थानांतील कायद्यामध्यें घेण्याची वहिवाट आहे. असें करण्याचें खरोखर ह्मटलें असतां कांहीं कारण नव्हतें ह्यांत शंका नाहीं; कारण, विशेषेंकरून, सामान्य कलमांचा आक्ट (सन १८८७ चा १ ला) ह्याच्या ९ व्या कलमांतील ठरावांचा विचार केला असतां असें बहुतकरून ठरेल कीं, सदहू प्रकारचा ठराव केल्याशिवायही तसा अधिकार मिळालेला आहेच; परंतु, सदरीं जी वहिवाट सांगितलेली आहे तीवरून, तसें नाहीं असें ह्मणतां येण्याचा संभव आहे ह्मणून, मद्रास कौन्सिलच्या आक्टांच्या बाबतींत, तेथल्या कायदे करणाऱ्या मंडळीनें सन १८९१ च्या १ ल्या आक्टाच्या १९ व्या कलमाअन्वयें जसें केलें आहे तसें करून ह्या बाबतीचा अखेर निकाल लावण्याकारितां ही संधि साधली आहे.

**रकम २४.**—ही रकम ठरविली असतां, कायदे रद्द करून पुनः ठरविणाऱ्या प्रत्येक आक्टाच्या मसुद्यामध्यें, ज्या मसुद्याचा पुढें हाजी लोकांस नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट (सन १८९९ चा १४ वा) झाला त्यांत एक हंगामी ठराव दाखल केला होता त्याप्रमाणें, रद्द करावा ह्मणून योजिलेल्या कायद्याअन्वयें फर्माविलेले कोणतेही हुकुम, वारंटें, योजना, पत्रकें, कानू अगर पोट कायदे, त्यांच्या बदला नवीन कायद्याअन्वयें नवीन लेख योग्य रीतीनें करण्यांत येत तोंपर्यंत अमलांत राहूं देण्याकारितां एक हंगामी ठराव दाखल करावा लागतो, तो दाखल करण्याची जरूरी राहाणार नाहीं. रकान्यांतील हवाल्यांवरून असें दिसून येईल कीं, असाच एक ठराव, सन १८९१ चा मद्रासचा सामान्य कलमांचा आक्ट याच्या १८ व्या कलमांत, तेथल्या कायद्यांच्या संबंधानें ठरविलेला आहे.

**रकमा २५ व २६.**—हे ठराव सन १८६८ व १८८७ चे सामान्य कलमांचे आक्ट यांतून घेतले आहेत. वास्तविक पहातां, २९ व्या रकमेंत उतरून घेतलेला ठराव फक्त, तारीख ३ जानुआरी सन १८६८ नंतर केलेल्या आक्टांस आणि तारीख १४ जानुआरी सन १८८७ रोजीं व त्यानंतर केलेल्या कायद्यांस लागू व्हावा. तसेंच, २६ रकमेंतील ठराव, शेवटीं सांगितलेल्या तारखेरोजीं किंवा त्यानंतर ठरविलेल्या कायद्यांसच फक्त लागू व्हावा; परंतु ते सर्वत्र लागू आहेत असें मानण्यामध्यें कोणतीही भीति आहेसें दिसत नाहीं.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.